तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट ,येवती संचलित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव

## मराठी विभाग वार्षिक अहवाल : २०२३-२०२४

मराठी विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन केले होते. या शैक्षणिक वर्षामध्ये नियमित अध्यापन कार्यासाठी सत्रानुरूप अभ्यासक्रमाचा नियोजित आराखडा तयार करून त्याची पूर्तता करण्यात आली.

**प्रथम सत्र :**

प्रथम सत्रामध्ये दि : १५/०६/२०२३ ते ०४/११/२०२३ या कालावधीत पुढील उपक्रम राबविण्यात आले.

**१. परिसंवाद :**

विद्यार्थ्यांनी चिकित्सक पद्धतीने विचार करावा, संभाषण कौशल्य व व्यक्तिमत्व विकास, भाषा संवर्धन व साहित्य निर्मिती आणि लेखकांशी संवाद साठी महाविद्यालयात वर्गनिहाय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**२. अंतर्गत मूल्यमापन :**

बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय आणि बी.एस्सी, बी.कॉम, प्रथम, द्वितीय, वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या घटक चाचणी परीक्षांचे आयोजन करण्यात आले.

**३. भित्तिपत्रिका :**

स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयात दि: १५/०८/२०२३ रोजी विद्यार्थ्यांनी निवडक कथाकारांचा परिचय या शीर्षकाचे भित्तिपत्रक तयार करण्यात आले. देशभक्तीपर विविध माहितीचे व देशाच्या गौरवशाली कारकिर्दीविषयीचे लेख, कविता लिहिलेली भित्तिपत्रिका तयार करण्यात आली. यावेळी श्री कमलाकर बापू पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत चौधरी यांनी या भीतीपत्रिकेचे उद्घाटन केले. यावेळी प्रा. डॉ. सहदेव रसाळ, प्रा. डॉ. कृष्णा तेरकर, प्रा. डॉ. मारुती गोरे, प्रा. प्रमोद पाटील इत्यादी उपस्थित होते.

**द्वितीय सत्र :**

दि : २८/११/२०२३ ते दि : ०१/०४/२०२४ या कालावधीत द्वितीय सत्र संपन्न झाले. या सत्रामध्ये प्राध्यापक निहाय निश्चित करण्यात आलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

**१) चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची :**

समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक लोकशाही या वारकरी संप्रदायातील मूल्यांचा उत्कर्ष व संवर्धनासाठी संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे,चोखोबा ते तुकोबा : एक वारी समतेची मध्यवर्ती संयोजन समिती, आयोजित चोखोबा ते तुकोबा एक वारी समतेची श्री संत चोखामेळा महाराज कर्मभूमी श्री मंगळवेढा ते श्री संत तुकोबाराया जन्मभूमी श्री क्षेत्र देहुगाव पर्यंत ही वारी जाते. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयामध्ये दि: १०/०१/२०२४ रोजी या वारीचे आयोजन करण्यात आले होते. मराठी विभागाच्या वतीने या वारीचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री सचिन पाटील, श्री महारुद्र जाधव, श्री शेषाद्री डांगे, श्री प्रमोद पाटील, प्रा. डॉ. सहदेव रसाळ, प्रा. सोमनाथ लांडगे, प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी इत्यादी प्रमुख मान्यवरांच्या मार्गदर्शनाने या वारीची सांगता झाली.

२) **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा:**

दि १४ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

३) **मराठी राजभाषा दिन :**

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मराठी विभाग व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे श्री कमलाकर बापू पाटील, प्राचार्य डॉ प्रशांत चौधरी, प्रा. डॉ. सहदेव रसाळ, डॉ. कृष्णा तेरकर, डॉ. मारुती गोरे, प्रा. प्रमोद पाटील इत्यादींची कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती होती. मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी कवी कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांचे योगदान किती मोठे आहे याचा विचार प्रमुख मान्यवर श्री कमलाकर बापू पाटील यांनी मांडला. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी कवी कुसुमाग्रज यांचे साहित्य हे वैश्विक साहित्य असून त्यांच्या साहित्याने मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवले. असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. कृष्णा तेरकर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. मारुती गोरे यांनी मानले.

४) **काव्यवाचन:**

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कवींच्या लोकप्रिय कवितेचे वाचन करून तसेच स्वलिखित कवितेचे वाचन करून बहुसंख्येने सहभाग नोंदवला.

५) **भित्तिपत्रक :**

२६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त संत रामदास यांचे मनाचे श्लोक या विषयावर विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या भितीपत्रकेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ.अभय शहापूरकर, श्री गणेश मिलिंदजी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांच्या शुभहस्ते भितीपत्रकेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. सहदेव रसाळ, प्रा. डॉ. कृष्णा तेरकर, प्रा. डॉ. मारुती गोरे, प्रा. प्रमोद पाटील इत्यादी उपस्थित होते.

६) प्रमाणपत्र अभ्यासक्रम उद्घाटन:

दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्रातील संत परंपरा आणि समरसता प्रमाणपत्र अभ्यासक्रम उद्घाटन करण्यात आले. यावेळी श्री. शेषाद्री डांगे, श्री. कमलाकर बापू पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने यांचे उद्घाटन झाले.

वरील प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये सत्र एक व सत्र दोन मध्ये विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. सहदेव रसाळ
(सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग)

डॉ प्रशांत चौधरी
PRINCIPAL
Venkatesh Mahajan Senior College
Dharashiv

VENKATESH MAHAJAN SENIOR COLLEGE
OFFICE
DHARASHIV